।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**

संदर्भ : परीक्षा/२०२०-२१/५७५ दिनांक : ०६/११/२०२०

<u>परीपत्रक</u>

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर व परभणी
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : उन्हाळी २०२० परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त परीक्षेबाबत.
संदर्भ : परीक्षा विभागाचे पत्र क्र. संदर्भ : परीक्षा/२०२०-२१/५५८ दिनांक : २९/१०/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२० परीक्षा हया दिनांक १५/१०/२०२० ते २९/१०/२०२० दरम्यान ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या आहेत. या परीक्षेदरम्यान जे विद्यार्थी तांत्रिक व इतर कारणांमुळे सदर परीक्षा देऊ शकले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय दिनांक ३१/१०/२०२० रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे..

सदर निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की उन्हाळी २०२० ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेसाठी ज्या नियमीत व बॅकलॉग विषयांच्या विद्यार्थ्यांनी अंतीम वर्ष परीक्षेकरीता आवेदन पत्र भरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयाच्या परीक्षा दोन वर्षीय अभ्यासक्रमासाठी पहिले व दूसरे सत्र, तीन वर्षीय अभ्यासक्रमासाठी तीसरे, चौथे सत्र, चार वर्षीय अभ्यासक्रमासाठी पाचवे, सहावे सत्र व पाच वर्षीय अभ्यासक्रमासाठी सातवे, आठवे सत्र महाविद्यालय स्तरावर परीक्षा घेवून गुण पाठविले आहेत. परंतु या परीक्षेदरम्यान कोणी वंचित राहीला असेल, तांत्रिक बिघाड झाला असेल, अनुपस्थित असेल अशा विद्यार्थ्यांची दोन वर्षीय अभ्यासक्रमाच्या पहिल्या व दुस-या सत्रातील तीन वर्षीय अभ्यासक्रमाच्या तिस-या व चौथ्या सत्रातील, चार वर्षीय अभ्यासक्रमाच्या पाचव्या व सहाव्या सत्रातील व पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या सातव्या व आठव्या सत्रातील अनियमित (Backlog) विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर दि. १०/११/२०२० ते २५/११/२०२० दरम्यान घेण्यात यावी व वरील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षाच्या दोन्ही सत्राची परीक्षा विद्यापीठामार्फत बहुपर्यायी प्रश्न व ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने दिनांक २५/११/२०२० ते दिनांक ०५/१२/२०२० या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे.

सबब, परीक्षा मूल्यमापन मंडळाच्या निर्णयानुसार व संदर्भांकिंत पत्रास अनुसरुन दिनांक ०५/११/२०२० रोजी पर्यंत प्राप्त माहितीनुसार सदर विद्यार्थ्यांची अतिरिक्त परीक्षा दिनांक २५/११/२०२० पासुन घेण्यात येणार आहे. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक लवकरच विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाब सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव : मा. कुलगुरु महोदय
मा. प्र-कुलगुरु महोदय